महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व पंचायतराज
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१

**Website : www.rdd.maharashtra.gov.in** **EMAIL ID- rdd.est5a-mh@mah.gov.in**

क्र.संकीर्ण-०९/२०२६/प्र.क्र.२७/आस्था-५ अ दि.१५ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
धाराशिव/लातूर/बीड/छ.संभाजीनगर/जालना/नांदेड.

विषय:- सेवा संकल्प अभियानांतर्गत नारीशक्ती मेळावा व आशा, अंगणवाडी सेविका संवाद कार्यक्रम आयोजित करण्याबाबत..

संदर्भ:-१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः सेसंअ-२०२६/ प्र.क्र.९५/रवका-२, दिनांक ९ सप्टेंबर, २०२६,
२) ग्रामविकास व पंचायतराज विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-०९/२०२६/ प्र.क्र.२७/आस्था-५अ, दि.१६.९.२०२६
३) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे दिनांक ०९.१०.२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०९ सप्टेंबर, २०२६ अन्वये राज्यात दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत **"सेवा संकल्प अभियान"** राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर अभियानांतर्गत **"सेवा माझे योगदान"** हा घटक समाविष्ट असून, त्यामध्ये महिलांचे आरोग्य व स्वच्छता, पोषण व ॲनिमियाबाबत जनजागृती, जलसंधारण तसेच जलस्त्रोतांची स्वच्छता यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे.

२. राज्यातील सद्यस्थितीतील दुष्काळसदृश परिस्थितीच्या अनुषंगाने महिला, वृद्ध महिला, लहान बालके व शेतकरी महिला यांच्या आरोग्य व कल्याणाच्या दृष्टीने विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आशा सेविका, अंगणवाडी सेविका व महिला व बाल विकास विभागातील संबंधित अधिकारी यांच्या सहभागातून नारीशक्ती मेळावा व संवाद कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार, आपल्या जिल्हा परिषदेमार्फत पुढील पृष्ठावरील नमूद वेळापत्रकानुसार नारीशक्ती मेळाव्याचे आयोजन करण्याबाबत संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर,

मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांनी कळविले आहे (प्रत सोबत.)

| दिनांक | वेळ | कार्यक्रमाचे ठिकाण |
|---|---|---|
| १४.१०.२०२६ | सकाळी ११.३० वाजता | धाराशिव |
| १५.१०.२०२६ | दुपारी १.०० वाजता | लातूर |
| १६.१०.२०२६ | सकाळी ११.३० वाजता | बीड |
| १७.१०.२०२६ | सकाळी ११.३० वाजता | छत्रपती संभाजीनगर |
| १८.१०.२०२६ | सकाळी ११.३० वाजता | जालना |
| १९.१०.२०२६ | सकाळी ११.०० वाजता | नांदेड |

३. तरी, सदर मेळाव्याच्या आयोजनासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. जिल्ह्यातील आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच महिला व बाल विकास विभागातील संबंधित अधिकारी यांना कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात यावे.

२. महिलांचे आरोग्य व स्वच्छता, पोषण, ॲनिमिया प्रतिबंध व जनजागृती, जलसंधारण व जलस्रोत स्वच्छता या विषयांवर मार्गदर्शन व संवाद सत्रांचे आयोजन करण्यात यावे.

३. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आशा सेविका व अंगणवाडी सेविका यांचा कार्यक्रमादरम्यान यथोचित सन्मान करण्यात यावा.

४. कार्यक्रमास आवश्यक ती पूर्वतयारी करून निर्धारित दिनांक व वेळेनुसार मेळावा यशस्वीरीत्या पार पाडण्याबाबत दक्षता घ्यावी.

४. उपरोक्त निर्देशांनुसार आपल्या जिल्ह्यात नारीशक्ती मेळावा व आशा, अंगणवाडी सेविका संवाद कार्यक्रमाचे आयोजन तातडीने करून आवश्यक ती कार्यवाही करावी.

आपला,

(हेमंत डांगे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत- वरीलप्रमाणे

प्रत- १) मा.सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई-०१ यांचे स्वीय सहायक यांना माहितीस्तव.

२) निवडनस्ती कार्यासन आस्था-५ अ.